**सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदी, विक्री व स्थापत्य बांधकामाच्या निविदा मंजूरीचा विचार करण्यासाठी राज्यस्तरीय समित्यांची नियुक्ती करणेबाबत**

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सुतगि १२००/११७१३/प्र.क्र. ४२६/टेक्स-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १५ जून, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सुतगि १२००/११७१३/प्र.क्र. ४२६/टेक्स-१ (अ), दिनांक १६.११.२००२.

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक : सुतगि १२००/ ११७१३/ प्र.क्र. ४२६/ टेक्स-१(अ), दिनांक २४ फेब्रुवारी, २००५

प्रस्तावना :-

शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सुतगि १२००/११७१३/प्र.क्र. ४२६/टेक्स-१ (अ) दिनांक १६.११.२००२ अन्वये सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामाच्या निविदा मंजूरीसाठी राज्यस्तरीय समित्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यांत आलेल्या समित्यांमध्ये व त्यांच्या कार्यपध्दतीत वरील संदर्भ क्रमांक २ दिनांक २४ फेब्रुवारी, २००५ च्या शासन निर्णयान्वये काही बदल केलेले आहेत. आता सदर शासन निर्णयामध्ये कांही सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

शासन आता, सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीस, जुन्या यंत्रसामुग्रीच्या विक्रीस आणि स्थापत्य बांधकामाच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समित्या त्यांच्या कार्यपध्दतीसह गठीत करण्यात येत आहेत :-

अ) <u>सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीस मंजूरी देण्यासाठी समित्या.</u>

(१) <u>वित्तिय मर्यादा रुपये २५ लाखापर्यंत</u> :- सदर निर्णय गिरणीच्या संचालक मंडळाने घ्यावा.

वरील वित्तिय मर्यादेच्या अधिन राहून सर्व कर व शुल्कासह परंतु अंदाजपत्रकीय दरापर्यंत घ्यावा. जर सूत गिरणीला अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने यंत्रसामुग्री खरेदी करणे आवश्यक असल्यास सूतगिरणीने आवश्यक त्या तपशिलासह आणि कारणमिमांसेसह अधिक दराबाबतचा प्रस्ताव संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवावा. वस्त्रोद्योग संचालनालयाच्या मंजूरीनंतर यंत्रसामुग्री खरेदीसाठी कोटेशन मागवून अंतिम कार्यवाही करण्यात यावी.

(२) <u>वित्तिय मर्यादा रुपये १५ लाख ते ५० लाखापर्यंत</u> :- सदरचा निर्णय मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खालील नमूद केलेल्या समितीने घ्यावा.

| | |
|---|---|
| १) मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सचिव (उद्योग) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य |
| ६) संबंधित गिरणीचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, म.रा.नागपूर | सदस्य सचिव |

(३) <u>वित्तिय मर्यादा रुपये ५० लाखाचे वर</u> :- सदरचा निर्णय मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खाली नमूद केलेल्या समितीने घ्यावा :-

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सचिव (उद्योग) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई | सदस्य |
| ६) संबंधित सूत गिरण्यांचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य सचिव |

सूतगिरण्यांची यंत्रसामुग्री ही वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्ये- वसेच निश्चित अशा कंपन्यांनी तयार केलेली असते. त्यामुळे त्या यंत्रसामुग्रीमध्ये तुलना होऊ शकत नसल्याने यासाठी निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. यासाठी सूतगिरण्यांनी कोटेशन मागवून वरील समित्यांची मान्यता घेऊन यंत्रसामुग्रीचा खरेदी करावी. सूतगिरण्यांनी यंत्रसामुग्री खरेदीसाठी अंदाजपत्रकीय रकमेचे तुकडे पाडून कोटेशन मागवू नयेत. ज्या रकमेने अंदाजपत्रकीय मान्यता/तांत्रिक मान्यता मिळाली आहे त्याच रकमेचे कोटेशन मागवावेत. जर काही बाबतीत तुकडे पाडणे अपरिहार्य असेल तर त्याकरीता संचालक, वस्त्रोद्योग यांची पूर्व परवानगी घ्यावी. शासनाने उभारणीखालील सूतगिरणीची मॉडेल प्रकल्प किंमत निश्चित केली असून या अहवालात दर्शविलेल्या यंत्रसामुग्रीच्या किंमतीशी खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीची किंमत निगडीत असावी.

ब : <u>सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री विक्रीस मंजुरी देण्यासाठी समित्या</u> :-

(१) <u>वित्तिय मर्यादा रुपये १५ लाखापर्यंत</u> :- सदर निर्णय गिरणीच्या संचालक मंडळाने घ्यावा.

जर सूत गिरणीला अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा स्विकारणे आवश्यक असल्यास सूतगिरणी ? आवश्यक त्या तपशिलासह वाजवी कारणमिमांसेसह प्रस्ताव संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र

राज्य, नागपूर यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवावा. संचालनालयाच्या मंजूरीनंतर निविदा अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(२) **वित्तिय मर्यादा रुपये २५ लाख ते ५० लाखांपर्यंत :-** सदरचा निर्णय मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खालील नमूद केलेल्या समितीने घ्यावा.

| | |
|---|---|
| १) मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त ) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सचिव (उद्योग) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य |
| ६) संबंधित गिरणीचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य सचिव |

(३) **वित्तिय मर्यादा रुपये ५० लाखाचे वर :-**

मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खाली नमूद केलेल्या समितीने निर्णय घ्यावा.

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त ) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सचिव (उद्योग ) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) संबंधित सूत गिरण्यांचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ६) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य सचिव |

**यंत्रसामुग्री विक्रीबाबत पुढील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.**

(१) सूतगिरणीने संचालनालयाकडे प्रस्ताव सादर करावा.

(२) संचालनालयात प्रस्तावाची छाननी करुन यंत्रसामुग्री विक्री करणे योग्य आहे किंवा कसे, हे ठरवावे.

(३) टेक्सटाईल रिसर्च इन्स्टीटयूट किंवा स्पिनिंग मिल फेडरेशन किंवा संचालनालयांतर्गत असलेले तांत्रिक अधिकारी यांचेपैकी कोणाकडूनही यंत्रसामुग्रीचे मुल्यांकन करण्यात यावे.

(४) संचालनालयाने मूल्यांकनानुसार यंत्रसामुग्री किंमतीची मर्यादा निश्चित करावी.

(५) ३ वर्तमानपत्रात निविदेसाठी जाहिरात देण्यात यावी.

(६) निविदा संचालनालयात उघडून विक्री किंमत जास्त मिळण्याच्यादृष्टीने निविदाधारकांशी वाटाघाटी करण्यात याव्यात, आणि त्यानंतर यंत्रसामुग्री विक्रीबाबतचा प्रस्ताव समितीपुढे सादर करण्यात यावा.

७) सूतगिरण्यांची यंत्रसामुग्री विक्री करणेच्या निविदा त्यांच्या कक्षेत आणण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेचे तुकडे पाडून निविदा मागवू नयेत. जर काही बाबतीत तुकडे पाडणे अपरिहार्य असेल तर त्याकरीता संचालक, वस्त्रोद्योग यांची पूर्वपरवानगी घ्यावी.

(८) प्रचलित पध्दतीनुसार सर्व प्रकारच्या कोऱ्या निविदांची विक्री सूतगिरणी स्तरावर तसेच, संचालनालयाच्या स्तरावर होईल. भरुन प्राप्त झालेल्या निविदा सूतगिरणी स्तरावर आणि संचालनालयाच्या स्तरावर स्विकारल्या जातील. सूतगिरणीस एखादया निविदाधारकाबाबत किंवा

त्यांच्या पात्रतेबाबत किंवा कार्यक्षमतेबाबत आक्षेप असतील तर निविदा उघडण्यापूर्वीच हे वस्त्रोद्योग संचालनालयाच्या निदर्शनास आणावे आणि या आक्षेपांचा विचार करुन वस्त्रोद्योग संचालनालयाने निविदा उघडावी किंवा कसे याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

२) प्राप्त झालेल्या निविदा वस्त्रोद्योग संचालनालयामध्ये उघडण्यात याव्यात आणि त्या त्यांच्या अभिप्रायासह त्यांनी राज्यस्तरीय यंत्रसामुग्री विक्री समितीस पुढील कार्यवाहीसाठी सादर कराव्यात. राज्यस्तरीय यंत्रसामुग्री विक्री समित्यांनी निविदा अंतिम करताना सर्व निविदा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवावे व त्यानंतरच निविदा अंतिम करण्याबाबत निर्णय घ्यावा.

क) सहकारी सूतगिरण्यांच्या स्थापत्य बांधकामाविषयी निविदा मंजूरीसाठी समित्या

(१) वित्तिय मर्यादा रुपये १५ लाखापर्यंत :- सदर निर्णय गिरणीच्या संचालक मंडळाने घ्यावा.

वरील वित्तिय मर्यादेच्या अधिन राहून सर्व कर व शुल्कासह परंतु, अंदाजपत्रकीय दरापर्यंत घ्यावा. जर सूत गिरणीला अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्विकारणे भाग पडल्यास सूतगिरणीने आवश्यक त्या तपशिलासह आणि कारणमिमांसेसह अधिक दराबाबतचा प्रस्ताव संचालक, वस्त्रोद्योग यांचेकडे मंजूरीसाठी पाठवावा. संचालनालयाच्या मंजूरीनंतर निविदा अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(२) वित्तिय मर्यादा रुपये १५ लाख ते ५० लाखापर्यंत :- सदरचा निर्णय राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खालील नमूद केलेल्या समितीने घ्यावा.

| | |
|---|---|
| १) राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सचिव (सार्वजनिक बांधकाम) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य |
| ६) संबंधित गिरणीचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य |

(३) वित्तिय मर्यादा रुपये ५० लाखाचे वर :- मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे स्तरावर खाली नमूद केलेल्या समितीने निर्णय घ्यावा :-

| | |
|---|---|
| १) मा. मंत्री (वस्त्रो.) | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी | --"- |
| ४) सचिव (सार्वजनिक बांधकाम) किंवा त्यांचे प्रतिनिधी | --"- |
| ५) संबंधित सूत गिरण्याचे अध्यक्ष | निमंत्रित सदस्य |
| ६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई | सदस्य |
| ७) संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य सचिव |

स्थापत्य बांधकामाबाबत जाहीर खुल्या निविदा मागविण्यात याव्यात. सूतगिरण्यांनी निविदा त्यांच्या कक्षेत आणण्यासाठी अंदाजपत्रकीय रकमेचे तुकडे पाहून निविदा मागवू नयेत. ज्या दराने [illegible] रकमेच्या निविदा मागवाव्यात. जर काही

बाबतीत तुकडे पाडणे अपरिहार्य असेलच तर त्याकरीता संचालक, वस्त्रोद्योग यांची पूर्वपरवानगी घ्यावी. सर्व निविदा अंतिम करण्यापूर्वी अशा कामाची एक निविदा पूर्व (प्री-बीड) सभा घेण्यात यावी. निविदापूर्व बैठकीत झालेल्या निर्णयाचा सामायिक बदल संच तयार करुन सर्व निविदा धारकांना द्यावा.

प्रचलित पध्दतीनुसार सर्व प्रकारच्या कोऱ्या निविदांची विक्री सूतगिरणी स्तरावर तसेच, संचालनालयाच्या स्तरावर होईल. भरुन प्राप्त झालेल्या निविदा सूतगिरणी स्तरावर आणि संचालनालयाच्या स्तरावर स्विकारल्या जातील. सूतगिरणीस एखादया निविदाधारकाबाबत किंवा त्यांच्या पात्रतेबाबत किंवा कार्यक्षमतेबाबत आक्षेप असतील तर निविदा उघडण्यापूर्वीच हे वस्त्रोद्योग संचालनालयाच्या निदर्शनास आणावे आणि या आक्षेपांचा विचार करुन वस्त्रोद्योग संचालनालयाने निविदा उघडावी किंवा कसे याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. याप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा वस्त्रोद्योग संचालनालयामध्ये उघडण्यात याव्यात आणि त्या त्यांच्या अभिप्रायासह त्यांनी राज्यस्तरीय स्थापत्य बांधकाम समितीस पुढील कार्यवाहीसाठी सादर कराव्यात. सर्व राज्यस्तरीय स्थापत्य बांधकाम समित्यांनी निविदा अंतिम करताना सर्व निविदा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवावे व त्यानंतरच निविदा अंतिम करण्याबाबत निर्णय घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०६१६१३४२५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( स.दि.खरात)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
अपर मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई - ३२
सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, वकील हाऊस, मुंबई-१
प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, मुंबई/सोलापूर/औरंगाबाद/नागपूर
सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
सर्व सहकारी सूतगिरण्यांचे कार्यकारी संचालक